# मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

(बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्र वगळून)

झोपुप्रा/प्रशासन/क्र.५७३/२०२५
दिनांक :- १६ डिसेंबर, २०२५

स्वारस्य पत्र (Expression of Interest)

मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे या कार्यालयामार्फत झोपडीधारकांना सर्व सुखसोयीसह "मोफत घरे" मिळवून देण्यासोबतच झोपडपट्टीवासीयांना हक्काचे घर देणे व त्यांचे जीवनमान उंचावणे हे ध्येय असून झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील झोपडीधारकांना त्याच जागेवर घरे बांधून दिली जावी याकरिता "मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची" स्थापना करण्यात आलेली आहे. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेखाली येणारी जमीन, विगतवारीनुसार केंद्र सरकार व राज्य सरकार आरक्षित जमीन, भारतीय रेल, भारतीय वनविभाग, कांदळवन (CRZ ११), संबंधित महानगरपालिका, औद्योगिक वसाहत, म्हाडा, सिडको व खारफुटीचे वन यांच्यापैकी नेमकी कोणाच्या मालकीची, याबाबत तपासणी करणे आवश्यक असते.

यास्तव झोपडपट्टयांचे योग्यप्रकारे सर्वेक्षण व त्यांचे विश्लेशण करुन विस्तृत स्वरुपात माहिती संकलित करणे आवश्यक असते. याकरीता अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करुन सदर काम अधिक सोपे व्हावे या उद्देशाने खुल्या बाजारातून अशाप्रकारे काम करणाऱ्या संस्थांकडून स्वारस्य पत्र (Expression of interest) मागविण्यात येत आहे.

सदर स्वारस्य पत्र पाठविण्याबाबत संस्थांनी सोबतच्या विवरणपत्रात दर्शविलेल्या अटी व शर्ती पूर्ण करणे आवश्यक राहील. तसेच, स्वारस्य पत्र पाठवितांना याबाबतची कागदपत्रे सोबत जोडणे आवश्यक राहील. सदर स्वारस्य पत्रे खाली नमूद केलेल्या पत्त्यावर पाठविण्यात येऊन सदर लिफाफ्यावर **झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे**, असे लिहावे. सदर स्वारस्य पत्र या कार्यासनास दिनांक २२ डिसेंबर, २०२५ रोजी संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत पोहोचेल अशा बेताने पाठवावे.

**(मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेने)**

Kalpana

(कल्पना जगताप)
**सचिव**
**मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,ठाणे**

**सोबत :- वरीलप्रमाणे**

प्रत :- निवडनस्ती.

**ठाणे महानगरपालिका मंडई इमारत, खेवरा सर्कल, मानपाडा, ग्लॅडी अल्वारीस रस्ता, ठाणे (पश्चिम)-४०० ६१०.**
**दुरध्वनी क्र.०२२-४१३५६८४०, E-mail ID- adminoffmmr@sra.gov.in**

## स्वारस्य पत्र सादर करण्याच्याा अनुषंगाने अटी व शर्तींचे विवरणपत्र

**अ) कामाची व्याप्ती**: ठाणे एसआरए अधिकारक्षेत्रातील विविध झोपडपट्टी समूहांचे भू-स्थानिक आधारित विश्लेषण करणे.

**ब)** झोपडपट्टी क्लस्टर लेयर जीआयएस स्वरूपात आयात करणे. (ठाणे एसआरए द्वारे प्रदान केलेले)

**क) संकलित करावयाची माहिती (सदर माहितीमध्ये आवश्यकतेनुसार बदल करण्याचे अधिकार या कार्यालयास असतील)**

१) झोपडपट्टी समूहांचे भू-स्थानिक आधारित जमिनीचे विश्लेषण/सर्वेक्षण करणे.

२) झोपडपट्टीच्या सीमारेषांची अचूकता सुनिश्चित करण्यासाठी टोपोलॉजिकल आणि ॲट्रिब्यूट डेटा तपासणी करणे.

३) झोपडपट्टी क्लस्टर लेयर जी.आय.एस. स्वरूपात माहिती मिळविणे .

४) झोपडपट्टी क्लस्टर डेटा जी.आय.एस. सुसंगत स्वरूपात माहिती मिळविणे.

५) जमीनीची ड्रोन इमेजरी/गुगल अर्थ इमेजरीवर डिजिटायझेशन, जिओरेफरन्सिंग आणि सुपरइम्पोजिंग करून कॅडस्ट्रल ड्रॉइंग आयात करणे.

६) झोपडपट्टीच्या सीमारेषांची अचूक़ता सुनिश्चित करण्यासाठी टोपोलॉजिकल आणि ॲट्रिब्यूट डेटा यांची तपासणी करणे.

७) प्रकल्पक्षेत्राशी संबंधित गाव नकाशे गोळा करणे.

८) महसूल किंवा सर्वेक्षण विभागाकडून ७/१२ च्या नोंदींचे उतारे उपलब्ध करुन घेणे जेणेकरुन, प्रत्येक जमिनीच्या तुकडयाच्या मालकी हक्कांचा तपशील जसा की, सर्वेक्षण क्रमांक, मालकाचे नाव, जमीन क्षेत्रफळ यांची माहिती संकलित करण्यास मदत होईल.

९) उपलब्ध झालेल्या माहितींच्या नोंदी ठेवणे, झोपडीवर पडलेले क्रमांक यांच्या नोंदी घेणे, त्यामधील झोपडपट्टी अतिक्रमणाचे क्षेत्र निश्चित करणे व इतर.

**ड) अटी व शर्ती-**

i) अनिवार्य पात्रता निकष:

बोलीदाराने खालील स्व-प्रमाणित कागदपत्रे सादर करावीत-

१. कंपनी नोंदणी कायदा, १९५६ अंतर्गत नोंदणी,

२. वस्तू आणि सेवा कर (GST) नोंदणी प्रमाणपत्र / GST क्रमांक,

३. आयकर कायमस्वरूपी खाते क्रमांक

ii) गुणवत्ता प्रमाणपत्र: बोलीदाराकडे वैध ISO९००१:२०१५ प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे आणि ते सादर करणे आवश्यक आहे.

iii) कोणत्याही अर्जदाराला वैयक्तिक किंवा कोणत्याही कंपनीच्या स्वरूपात दोन वेगवेगळे EOI अर्ज सादर करण्याची परवानगी नाही.